RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

• Mailing Address •

Dr. Sadashiv H. Sarkate

Editor : POWER OF KNOWLEDGE

Head of Dept. Marathi

Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)

Cell. No. 9420029115 / 7875827115

Email : powerofknowledge3@gmail.com / shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-

Annual Subscription: Rs. 1000/-

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Volume. I, Issue I**
*Arpil to Jun 2020*

Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
E-mail : Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chanclier Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Ex-Professor, Dept. of Economics Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member Dean, Faculty of Science, Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology Faculty of Fisheries and Marine Sciences Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College, Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.D.P. Takale**
Professor & Head Dept. of Economics L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha. Dist. Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology, Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member **Dr.B.A.M.U.Aurangabad**

**REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English Dr.B A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College, Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College, Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**
**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**
**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

| | | | |
|---|---|---|---|
| | Printing Area | August 2021 | 2394-5303 | https://www.vidyawarta.com/03/ |

## अनुक्रमणिका


| अ.क. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ कं. |
|---|---|---|---|
| 1 | IMPORTANCE OF NATIONAL SERVICE SCHEME (NSS) IN CREATING SOCIAL RESPONSIBILITY AT HIGHER EDUCATION | Mohamad Mustafa Mujawar<br>Dr.Shivalingappa B.P<br>Mrs Rani Channamma.S.Halse | 01-05 |
| 2 | Language Policy in India, not Politics ! | Prof Prajakta S. Raut | 06-10 |
| 3 | Growth & Problems of Woman Entrepreneurship in India | Mr.Jadhav Sandeep B. | 11-14 |
| 4 | Differentiated Instruction for all learners: Inclusive Classroom Practices | Jyoti Vaman Kharat,<br>Dnyaneshwar L. Sawant | 15-23 |
| 5 | STUDY OF EFFECT OF FITNESS TRAINING FOR THE DEVELOPMENT IN PERFORMANCE OF BADMINTON PLAYERS | DR. Seema V. Deshmukh | 24-26 |
| 6 | GEOGRAPHICAL DISTRIBUTION OFCOVID-19 INFECTION AMONG THE DISTRICTS OF NORTH BIHAR | Dr. ALPNA JYOTI | 27-35 |
| 7 | A GEOGRAPHICAL STUDY OF CHANGING SEX RATIO IN AMRAVATI DISTRICT (MAHARASHTRA) | Dr. Sandip S. Bhavsar<br>Dr.ParagVishnupantTatte | 36-41 |
| 8 | Dr.Ambedkar's Vision for India's Dalits | MAHAMAD YUNUS. B . H | 42-45 |
| 9 | भारतीय समाज सुधारकांची पर्यावरणीय आंदोलने – एक अभ्यास | डॉ.प्रा.सौ. एस.पी. लाखे | 46-56 |
| 10 | पर्यावरणीय आपत्ती व्यवस्थापन : पुर | प्रा. डॉ. घोडके जे.व्ही. | 57-60 |
| 11 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा : स्थिती व गती | जयद्रथ जाधव | 61-68 |
| 12 | नव्वदोत्तरी मराठी कविता कालखंड आणि नवपरिमाण | एस.पी.पवार | 69-76 |
| 13 | शाश्वत शेतीचे निर्यात व्यापारातील महत्व | डॉ.रवींद्र चव्हाण<br>सौ.मीना र. चव्हाण | 77-82 |
| 14 | १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील जीवन चित्रण | डॉ. सोपान माणिकराव सुरवसे | 83-88 |
| 15 | साहित्यातील साहित्यिकांची भूमिका : | डॉ. अशोक ऊ. घोळवे | 89-91 |
| 16 | मराठवाड्यातील मतदारसंघ पुनर्रचित १५ व्या लोकसभेचा अभ्यास | डॉ.जयराम ढवळे | 92-96 |
| 17 | माझा प्रवास (१९५७ च्या बंडची हकीकत सांगणारे) प्रवास वर्णन | संजय जनार्दन आगलावे | 97-100 |
| 18 | बहिणाबाईच्या कवितेतील कृषी अनुभुती | प्रा.रमेश रिंगणे | 101-103 |

# मराठवाड्यातील मतदारसंघ पुनर्रचित १५ व्या लोकसभेचा अभ्यास

**डॉ.जयराम ढवळे**
राज्यशास्त्र विभग
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता.गेवराई जि.बीड

**प्रस्तावना :-**

१९६० ते २०११ पर्यंत महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीचा अभ्यास करावयाचा झाल्यास त्यामध्ये लोकसभा निवडणुकीतील लोकांचे राजकीय वर्तन बारकाईने लक्षात घेतले पाहिजे. असा अभ्यास हा राज्यस्तरावर आणि प्रादेशिक स्तरावर केला जातो. डॉ. सुहास पळशीकर आणि नितीन बिरमल यांनी म्हटले आहे, भारताच्या राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी राज्यपातळीवरील राजकारण समजून घेतले पाहिजे, हे आता सर्वसामान्य होऊ लागले आहे. राज्यपातळीवरील राजकारणाच्या या अभ्यासातून दोन प्रकारे अखिल भारतीय राजकारणावर प्रकाश पडतो. एक म्हणजे वेगवेगळ्या राज्यांमधील राजकारणाची समान सूत्रे त्यातून स्पष्ट होतात. दुसरे म्हणजे त्या त्या राज्याचे वेगळेपण कशात आहे, खास वैशिष्ट्य काय आहे, याचा उलगडा राज्यपाळीवरील राजकारणाच्या अभ्यासातून होतो.[१] आता यापुढे जाऊन राजकारणाचा अभ्यास केवळ राज्यस्तरावर नव्हे तर प्रादेशिक स्तरावर सुध्दा केला पाहिजे हे लक्षात घेऊन प्रस्तुत शोध निबंधात मराठवाड्यातील पुनर्रचित १५ व्या लोकसभा मतदारसंघातील निवडणुकांचा संक्षेपाने अभ्यास नोंदविला आहे. असा अभ्यास नोंदविताना त्यामागे लोकांच्या राजकीय वर्तनाचे विश्लेषण करावयाचे आहे.

या अभ्यासाची पार्श्वभूमी अशी की, महाराष्ट्राचे राजकारण १९९० नंतर बदलत गेले. एवढेच नव्हे तर राजकारणाची नव्याने फेर जुळवाजुळव राजकीय पक्षांना करावी लागली. १९९० नंतरचे राजकारण १९६० ते १९८० च्या दोन दशकांपेक्षा पूर्णपणे वेगवेगळे होते.[५] मराठवाडा प्रदेशात तर चित्र याहीपेक्षा अधिक बदलत गेल्याचे दिसून येते. डॉ. प्रकाश पवार म्हणतात, राजकारणापासून आयोग अलिप्त असतो. त्यामुळे मतदारसंघ पुनर्रचना हा प्रशासकीय कार्याचा भाग म्हणून त्याचा अभ्यास केला जातो. मतदारसंघ सोईचा केला किंवा विरोधकांसाठी अडचणीचा केला, असे कटकारस्थानी राजकारण घडते, असे विश्लेषण केले जाते.[६] मतदारसंघाची पुर्नरचना हा प्रशासकीय सेवेचा भाग असतो. त्यात फारसा राजकीय हस्तक्षेप होत नसतो. हे लक्षात घेऊन मराठवाड्यातील मतदारसंघ पुनर्रचनेचा येथे अभ्यास केला आहे.

**लोकशाही आणि निवडणूका**

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या बहुसांस्कृतिक देशामध्ये लोकशाही रूजविण्याचे कार्य विविध प्रकारच्या अडचणीवर मात करून पार पाडले जात आहे. नानी पालखीवाला यांच्या मते, The heart of the nation is sound and human raw material is excellent. To a western mind India's inner strength and capacity for pations eridure and lamost unbelevable.[7]

भारताचे हृदय निरोगी आहे. पाश्चात्य मनाला असे वाटते की भारताचे आंतरिक सामर्थ्य असता ही संयतपणे टिकून राहात आहे व या बाबी खरोखर विश्वास ठेवण्यासारख्या वाटत नाहीत. जॉन कॅमेथ गॅलब्रेथ यांनी भारताच्या गरिबीमध्ये समृध्दी आहे असे म्हटले होते.[८] गेल्या काही दशकामध्ये कोट्यावधी भारतीयांनी राजकीय प्रक्रियेमधील

लोकशाहीमूल्ये असतात ते आत्मसात करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. पालखीवाला यांना वाटणारा आशावाद सार्थ आहे, यथार्थ आहे. त्यांनी म्हटले आहे, Indian siciety in course of time acquire the requisite political culture. The attitudes, habits is of tolerance mutual respect and new will which alone can make democracy workable.[9] भावी काळात काळाचा प्रवाह जाता पुढे जाईल तसा भारतीय समाज हा मुलभूत राजकीय समृध्दीचा अंगीकार करू शकेल. अभिवृध्दीमधील बदल सहिष्णुता, परस्पर आदर आणि सद्भावना या गुणांची वाढ होईल तेंव्हा लोकशाही अधिक कर्तव्यप्रवण होईल. त्यांचा हा आशावाद सार्थ ठरला आहे. व भारतीय जनतेने सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी घडविलेले विविष्ट शहाणपण हे या प्रक्रियेचा भाग होय. १५ व्या लोकसभा निवडणुकीत मतदारांच्या वर्तनाचा हा अभ्यास याच दृष्टीने कराचयाचा आहे.

प्रा. संतोष दास्ताने यांच्या मते, राज्यातील वाढती लोकसंख्या आणि वाढती नागरी लोकसंख्या ध्यानात घेऊन विधानसभा आणि लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना करणे क्रमप्राप्त ठरते.[१०]

**अभ्यासाची दिशा आणि महत्व**

प्रस्तुत अभ्यासाचे महत्व खालील सहा मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

०१) मराठवाडा हा मागासलेला भाग असून या प्रदेशातील लोकांचे राजकीय वर्तन स्वातंत्र्योत्तर काळात काय बदलत गेले आहे त्याचा अभ्यास या शोधनिबंधात करण्यात येईल. लोकांची राजकीय प्रगल्भता व जाणीव जागृती यांचा परस्पर संबंध तपासणे शक्य होईल. प्रा. कुली यांच्या मते, राजकीय संस्कृती ही नेत्यांच्या राजकीय वर्तनाचा परिपाक असते. व्यक्तीचे राजकीय व मानसिक वर्तन हे सभोवतीच्या वातावरणाचा परिपाक असते.[११]

०२) मतदारसंघाच्या पुनर्रचनेचा राजकीय अभिव्यक्तीवर कसा परिणाम होतो ते अभ्यासले असता लोकांच्या सामाजिक रचनेचा राजकीय वर्तनावर पडणारा प्रभाव शास्त्रीयपणे अभ्यासता येतो. एखाद्या मतदारसंघातील जात वा धर्म वा पंथाचा प्रभाव हा पुनर्रचनेपुढे बदलतो काय व त्याचा काय परिणाम होतो हेही लाक्षात घेता येते राजकीय समाजशास्त्रामध्ये व्यक्तीच्या सामाजिक व मानसिक जडणघडणीचे आकलन करून त्याचे वर्तन शास्त्रीयपणे समजावून घ्यावे लागते.[१२]

०३) एखाद्या प्रदेशात वा मतदारसंघातील राजकीय पूर्वप्रभाव हा मतदारसंघाच्या पुनर्रचनेमुळे कसा बदलतो हे ही या अभ्यासातून स्पष्ट होईल. नवा मतदार समुह हा पूर्वसंस्कारात कसा सामोरे जातो तेही अभ्यासता येते राजकीय वर्तनप्रक्रियेमध्ये विचारसरणी, राजकीय संघटन, धर्म व जातीचा प्रभाव हे सर्व घटक महत्वाचे ठरतात गेल्ड मेयर्स यांच्या मते राजकीय संवाद हा लोक व सभोवतीचे वातावरण यांच्या आंतरक्रियातून घडतो मात्र कुटुंबातील वातावरण व सहकारी यांच्या प्रभावातून हे वातावरण बनते.[१३]

०४) मतदारसंघाचे आरक्षण जेंव्हा बदलले जाते तेंव्हा त्यामुळे राजकीय वर्तनात बदल होतो. कारण त्यामुळे मतदारसंघाची केवळ सामाजिक दृष्टीच नव्हे तर राजकीय समीकरणेही बदलतात. लोकशाहीमध्ये विशिष्ट जाती वा समुहाचे राजकीय प्राबल्य बदलण्यासाठी हे बदल प्रामुख्याने फलदायी ठरतात. ते ही या अभ्यासामुळे समजून घेता येईल ``प्रसार माध्यमे आंतरवैयक्तिक संवाद आणि जनसंवाद माध्यमातून मतनिर्मिती होते.``[१४]

०५) मतदारसंघ महिलांसाठी आरक्षित केला जातो तेंव्हा राजकीय वर्तन प्रक्रियेवर पडणारे प्रभाव हे लक्षणीय असतात महिलांचे राजकीय वर्तन हे लोकशाहीच्या सबलीकरणासाठी पोषक ठरते. या संदर्भात मेयर्स गेल म्हणतात, माध्यमाव्दारे जनमतावर पडणारा प्रभाव हा राजकीय मतनिर्मिती करत असतो तसेच परस्पर चर्चा विचारविनिमय व मंथनातूनही मते घडतात.[१५] भारतीय महिलांच्या संदर्भात तर अशा सहवर्तनाचा प्रभाव अधिक जाणवतो.

मराठवाड्यातील बहुतेक अभ्यास हा एखाद्या राजकीय नेत्यांच्या, राजकीय पक्षाचा, एखाद्या लोकसभामदार संघाचा करण्यात आला आहे. एकुणच मराठवाडा विभागातील लोकसभा निवडणुक प्रक्रियेचा अभ्यास झालेला नाही म्हणूनच मराठवाड्यातील मतदारसंघ पुनर्रचीत १५ व्या लोकसभा निवडणुकीच्या अभ्यासात मतदारांचा, आरक्षीत मतदार संघाचा, स्त्री प्रतिनिधीचा, राजकीय बदलाचा यांचा एकत्रित पहिलाच अभ्यास आहे. त्यामुळे भारत सरकार महाराष्ट्र शासन, जनतेस विविध संस्था, विविध राजकीय पक्ष, शासनास, निवडणुक विषयीचे धोरण ठरविण्यास ही संपूर्ण माहिती उपयोगी पडेल. या सर्व दृष्टिकोणातुन या अभ्यासाचे महत्व आहे. या सर्व अभ्यासामध्ये राजकीय समाजशास्त्राच्या दृष्टीने लोकांच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास करावयाचा आहे. लोकवर्तनातील बदल त्यातील आंतरक्रिया आणि त्यांचा प्रभाव या सर्व बाबी शास्त्रीय अभ्यासाची महत्वाची ठरतात. त्यामुळे या प्रक्रियांचे सूक्ष्म राजकीय विश्लेषण करावयाचे आहे. मराठवाड्यातील राजकीय नेतृत्वाची मीमांसा करताना म्हटले आहे.[१९]

या नेतृत्वाच्या दुर्बलतेवर अथवा समर्थतेवर मतदारसंघाच्या पुनर्रचनेचा कसा प्रभाव पडला ते येथे शोधावयाचे आहे या संदर्भात म्हणतात,[२०] या सर्व परिस्थितीचे व बहुविध पैलूंचे शास्त्रीय आकलन या शोधनिबंधात करावयाचे आहे. राजकीय प्रबोधन हे विशिष्ट परिस्थितीतून अधिक विविधतेने नटलेल्या समुदायाशी यथार्थपणे केले जात असले तरी त्यांची धास्ती व प्रभाव हा लोकांच्या जातीवर अवलंबून असते.[२१] माध्यमाची विविधता आणि प्रभावक्षमता यातून नवी राजकीय प्रणाली विकसित होत आहे.[२२] सामाजिक व आर्थिक विकासाचे विविध प्रश्न मांडतांना नवीन प्रगत तंत्रज्ञानावर आधारलेली बहुमुखी प्रणाली विकसित होत आहे व ती मतनिर्मितीवर प्रभाव टाकत आहे.

भारतासारख्या देशात नव्या राजकीय नेतृत्वाचा विकास होत आहे. मतदारवर्ग कमालिचा जागरूक होत आहे. नोकरशाही सतर्क राहून काम करत आहे. उद्योगपती अपेक्षा पूर्ण करण्यासाठी राजकीय पक्षांचा उपयोग करून घेत आहेत. राजकीय पक्षांचे नेते परस्परांवर मात करण्यासाठी नवी व्यूहरचना करत आहेत. कार्यकर्ता वर्ग सतत जागरूक राहून लोकांच्या आशा-अपेक्षांना सामोरे जाण्याचा प्रयत्न करत आहेत.

**सामाजिक पाहणी : सुकानु अध्ययन**

मराठवाडा प्रदेशातील प्रत्येक जिल्ह्यातील १० याप्रमाणे ८० उत्तरदात्यांचे प्रश्नावलीच्या आधारे सुकानु अध्ययन करण्यात आले. या प्रश्नावली मध्ये लोकसभा निवडणूका मतदानाचे कर्तव्य, १५ वी लोकसभा निवडणूक, पुनर्रचना व राजकीय बदल, लोकसभा प्रतिनिधींचे कार्य, प्रचारतंत्राचा अभ्यास, उपाययोजना या घटकांवर आधारलेले ३० प्रश्न विचारण्यात आले. त्या आधारे मराठवाड्यातील लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेच्या प्रभावाचा ढोबळमानाने अभ्यास केला असता काही तथ्ये समोर येतात ती येथे मांडली आहेत.

**अनुमाने**

०१) मराठवाड्यातील पुनर्रचित मतदारसंघाचा कोणत्याही गटास फायदा झाला नाही. आघाडीस चार तर रालोआस चार जागा प्राप्त झाल्या.

०२) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे मराठवाड्यातील राजकारणात अमूलाग्र बदल झाले नाहीत. पुर्वीच्या परिस्थितीत थोडा बदल झाला, परंतु बलाबल कायम राहिले.

०३) पुनर्रचनेमुळे दलित उमेदवारांना नेतृत्वाची संधी लाभली आहे.

०४) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे प्रदेशात सामाजिक व आर्थिक विकासाला अपेक्षित गती लाभली नाही. विकासाचा अनुशेष कमी झाला नाही.

०५) प्रदेशातील सर्व लोकप्रतिनिधी लोकांच्या वाढत्या दबावामुळे आपल्या उपलब्ध विकास निधीचा उपयोग लोकांच्या विकास कामासाठी करावा लागत आहे.

०६) वाढत्या राजकीय जागृतीमुळे आदर्श आचारसंहितेच्या पालनाबाबत जागृती वाढत आहे. रजकीय पक्ष, वृत्तपत्रे व चित्रवाणी वाहिन्या त्यासाठी पूरक कार्य करत आहेत.

०७) मतदारसंघ पुनर्रचनेमुळे साचेबद्ध जातीय व वर्गनिहाय राजकीय वर्तनाचे यथायोग्य भाकीत करता येत नाही.

**राजकीय विश्लेषण**

डॉ. प्रकाश पवार यांनी म्हटल्याप्रमाणे मतदारसंघाची पुनर्रचनेच्या प्रभावावरून असे दिसते की, राज्यपातळीवरील आघाड्यांपेक्षा जिल्हा पातळीवर वेगवेगळी समीकरणे तयार झाली.[२३] लोकांमध्ये जागृती वाढत आहे व लोक मतदान करत आहेत. त्यांना पक्षापेक्षा उमेदवार आपल्या मदतीला किती धावून येतो याला अधिक महत्व द्यावेसे वाटते. प्रा. संतोष दास्ताने यांच्या मते, समान हितसंबंध असणाऱ्या, मर्यादीत उदिष्ट्ये असणाऱ्या व्यक्तिसमूहास सर्वसाधारणपणे दबावगट असे म्हटले जाते. राजकीय धोरणप्रक्रियेबाबत दबाव अथवा प्रभाव टाकण्याचे विधायक कार्य या गटांकडून केले जाते. सत्ता मिळवणे हे त्यांचे उदिष्ट नसते.[२४] महाराष्ट्रात अशा दबावगटांचा प्रभाव असल्यामुळे महाराष्ट्राचे राजकारण इतर प्रांताच्या तुलनेने अधिक प्रगल्भ व समतोल दिसून येते. पुनर्रचित लोकसभा मतदारसंघानंतर पुढील काळात होणाऱ्या संभाव्य बदलाबाबत डॉ. प्रकाश पवार म्हणतात, मतदारसंघ पुनर्रचनेमुळे लोकसभा व विधानसभा पातळीवरील राजकारणात ग्रामीण भागांपेक्षा शहरांचे पारडे जड होईल. शहरी राजकारणाचे राज्याच्या राजकीय अर्थकारणावरही नियंत्रण जास्त बळकट होईल. हा राज्यांतर्गत राजकारणातील महत्वाचा बदल असेल. प्रादेशिक, जिल्हा, तालुका व सामाजिक पातळीवर नवीन आघाड्या आकार घेतील.[२५]

**समारोप**

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की, पुनर्रचित लोकसभा मतदारसंघ हे राजकीय लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी टाकलेले एक पाऊल होते. त्यामुळे वर्ग व जातीचा प्रभाव कमी होऊन लोकांना स्वच्छ, मुक्त व निर्भयपणे वर्तन करता येऊ शकले. मतदारसंघ पुनर्रचनेचा प्रत्यक्ष राजकीय बदलावर प्रभाव पडला आहे असे नाही. मागास भागामध्ये सामाजिक व आर्थिक विकासाची प्रक्रिया वेगाने गतिमान झाल्याशिवाय व्यापक राजकीय जागृती होऊ शकत नाही. निवडणूक काळात अशी जागृती जेवढी अधिक होते तेवढ्या प्रमाणात प्रश्न सुटण्यास व विकासाचे अडकून पडलेले प्रवाह मुक्त

होण्यास मदत होते. मतदारसंघ पुनर्रचनेमुळे दुर्बल घटकातील नवे नेतृत्व उदयास येत आहे. हा मतदारसंघ पुनर्रचनेचा राजकीय परिपाक होय यात शंका नाही.

**संदर्भसूची**


०१) पळशीकर सुहास आणि बिरबल नितीन, महाराष्ट्राचे राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९, पृ.११

०२) कित्ता, पृ. १२

०३) कित्ता, पृ. १२

०४) डॉ. पवार प्रकाश, महाराष्ट्राच्या नव्या राजकारणाची पुनर्रचना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००९ पृ. ७

०५) कित्ता, पृ. ८

०६) कित्ता, पृ. ९

07) Palkhiwala Nani, We the Nation : The 1st Decades. PSPD, New Delhi, 1994, pg. 12

०८) कित्ता, पृ. १२

०९) कित्ता, पृ. १३

१०) दास्ताने संतोष, महाराष्ट्र - २०११, दास्ताने रामचंद्र ॲण्ड कं. पुणे, २०११, पृ. १८७

11) Cooley C. H., Human Nature and Social Order, New Yourk 1962, Pg. 237-38

12) Myears Gail E and Myers Michel E., Toleord (ed.) The Dynamics of Human Communication, McGrwa Hill Int. 1988, Pg. 7

13) Ibid, Pg. 8

14) Ibid, Pg. 8-9

15) Curran James and Gure Vitch Michel Mass Media and Society, Oxford Univerisity Press, 2000, Pg. 150

16) Ibid, Pg. 150

17) Ibid, Pg. 159

१८) काळे भगवान, मराठवाडा काल आणि आज संकेत प्रकाशन जालना, पृ.

१९) कित्ता

२०) कित्ता


■■■